## प्लास्टिक फूल बंदीचा निर्णय

**मुंबई ।** चीनमधून आयात होणाऱ्या प्लास्टिक फुलांवर बंदी घालण्याचा निर्णय याच आठवड्यात घेतला जाणार असल्याची माहिती दिली. शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे यांनी या मुद्यावर शेतकरी आंदोलन करत असल्याचा मुद्दा औचित्याद्वारे आज विधानसभेत मांडला. त्यावर उत्तर देताना गोगावले म्हणाले की, मंगळवारी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली आहे. या बैठकीत ठरल्यानुसार याच आठवड्यात कायमची बंदी आणणार आहे.


शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

आज भविष्यवेध



मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्वारे उपचार
✓ संडासद्वारे रक्त पडणे व कोंब येणे
✓ गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
✓ गुदमार्ग लहाण होणे ✓ गुदद्वाराजवळ सेप्टीक होणे
✓ माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईमेंट घेऊन येणे...
डॉ.मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २७ । अंक ३१२ । गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ । पाने -८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### अति तेथे माती...

देशातील जनतेला साखर आणि तेलाच्या सेवनाचे योग्य प्रमाण सांगायचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. समोसा, वडापाव, भजी, लाडू, जिलेबी आदींसह सर्व तऱ्हेच्या चटपटीत जंकफूडचा आस्वाद घेणाऱ्या खवय्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.आरोग्याला घटक असूनही जंकफूडची चटक लोकांना लागली आहे. केवळ बाहेरचे खाद्यपदार्थच नव्हे तर कोणतीही गोष्ट अती झाली की, त्याची माती झाल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच भारतातील प्राचीन वैद्यकीय उपचारपद्धती असलेल्या आयुर्वेदात आहार आणि विहारावर सखोल विचार केल्याचे दिसून येते. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक घातकच ठरतो. सर्वांना ते चांगले ठाऊक आहे, पण खवय्येगिरीपुढे त्याचा विसर बहुतेकांना पडत चालला असावा. त्यामुळेच असे खाणे-पिणे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार आणि प्रसंगी कर्करोगासारख्या दीर्घकालीन व्याधींचे प्रमुख कारण ठरत आहे. अशा पदार्थांच्या अतिसेवनाने प्रमाणापेक्षा जास्त तेल आणि साखर पोटात जाते. त्यामुळे चरबीचे प्रमाण वाढत जाते. खाद्यतेलाचा टाळण्यासाठी पुनर्वापर आहारशास्त्र निषिद्धच मानते. काही दशकांपूर्वी पन्नाशीनंतर आढळणारे अनेक आजार माणसांना आजकाल तरुण वयातच ग्रासत आहेत. त्या धोक्यांबाबत वैद्यकीय तज्ज्ञ वारंवार लक्ष वेधून घेतात. तरीही म्हणावी तितकी जागरूकता समाजात अजूनही आलेली नाही. त्यात आता केंद्र सरकारच्या नव्या इशाऱ्याची भर पडली आहे. तेलकट-गोड पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत धोक्याचा इशारा देणारे फलक सध्या केंद्र सरकारच्या सर्व कार्यालयांतील उपाहारगृहांत लावले जातील. पुढे तसे फलक लावण्याची सक्ती कदाचित सर्वत्र केली जाईल. यामागे सरकारचा हेतू जनहिताचा वाटत असला तरी पुढे जाऊन फलक न लावणाऱ्या उपाहारगृहांवर कारवाईचा दंडुका सरकारी बाबूलोक उगारतील. त्यातून 'खाण्याचा' नवा मार्ग शोधला जाणार तर नाही ना? तेलकट आणि गोड पदार्थांच्या सेवनातून होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत नुसता इशारा देऊन भागणार नाही; तर त्याबाबत जागरूकताही वाढवावी लागेल, पण शेवटी आरोग्याची काळजी घेणे ही ज्याची- त्याची व्यक्तिगत जबाबदारी आहे.



# आमच्यासोबत सत्तेत या!

## देवेंद्र फडणवीसांची उद्धव ठाकरेंना थेट ऑफर

**मुंबई ।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना सत्तेत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आहे. अंबादास दानवे यांचा विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ संपत असल्याने त्यानिमित्ताने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केले आहे.

उद्धवजी २०२९ पर्यंत काहीही स्कोप नाही, आम्हाला त्या बाकावर यायचा स्कोप नाही, मात्र तुम्हाला या बाकांवर यायचे असेल तर बघा, स्कोप आहे. ते आपण वेगळ्या पद्धतीने बोलू, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्याची आता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

अंबादास दानवे यांचा विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ संपला आहे, त्यांच्या निरोप समारंभाच्या भाषणावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टोलेबाजी केल्याचे पाहायला मिळाले. उद्धवजी २०२९ पर्यंत काहीही स्कोप नाही, आम्हाला त्या बाकावर यायचा स्कोप नाही, तुम्हाला इथे यायचे असेल तर बघा, स्कोप आहे. ते आपण वेगळ्या पद्धतीने बोलू, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी थेट उद्धव ठाकरे यांना सत्तेत येण्याची ऑफर दिली आहे, फडणवीस यांच्या या वक्तव्याची आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष असल्याचेही यावेळी फडणवीस यांनी म्हटले आहे.

मुंबईमध्ये पाच जुलै रोजी विजयी मेळावा पार पडला, या मेळाव्याला दोन्ही ठाकरे बंधुंची उपस्थिती होती, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची उपस्थिती होती, या मेळाव्यानंतर पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीची चर्चा रंगली आहे, याच दरम्यान आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना सत्तेत सहभागी होण्याची ऑफर दिल्याने फडणवीसांच्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष असल्याचंही ते यावेळी म्हणाले आहेत. शिवसेना आपला जुना मित्रपक्ष आहे भलेही त्यात काही बदल झाले असतील असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

### 'त्या' गोष्टी खेळीमेळीनेच घ्या- ठाकरे

अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभानंतर उद्धव ठाकरेंनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीसांनी दिलेल्या ऑफरबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. याला उत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सभागृहात या गोष्टी खेळीमेळीने झाल्यात आणि त्या गोष्टी खेळीमेळीनेच घ्यायला हव्यात.

### ठाकरे अन् शिंदेंमध्ये फक्त खुर्चीचे अंतर

अंबादास दानवेंच्या निरोपाचे फोटोसेशन सुरु असताना उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा समोरासमोर आले. एकाच फोटोफ्रेममध्ये उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे हे एकत्र बसले होते मात्र त्यांमध्ये फक्त एकाच खुर्चीचे अंतर होते. यावेळी दोघांनीही एकमेकांशी बोलणे टाळले. विधान परिषदेमध्ये अंबादास दानवे यांचा निरोपसमारंभ पार पडल्यानंतर विधिमंडळपरिसरात परंपरेप्रमाणे फोटो सेशन घेण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्याकडेच सर्वांच्या नजरा होत्या. सुरुवातील सत्ताधाऱ्यांसोबत फोटोसेशन पार पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांचे आगमन झाले. त्यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यासह सर्व प्रमुख नेते उभे राहिले. त्यानंतर निलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांना एकनाथ शिंदे यांच्या शेजारी बसण्यास सांगितले. नीलम गोऱ्हे एकडे बसा म्हणून आग्रह करत होत्या मात्र उद्धव ठाकरेंनी त्यांना नकार दिला. त्यानंतर ते नीलम गोऱ्हे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शेजारी जाऊन बसले. मात्र यावेळी दोघांनीही एकमेकांना पाहिले नाही किंवा संवादही साधला नाही. त्यामुळे या घटनेची जोरदार चर्चा सुरु झालीय.

## मी पुन्हा येईन,पण कुठून ते विचारु नका- दानवे

**मुंबई ।** वयाच्या दहाव्या वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहे. त्यावेळी ज्या ठिकाणी संघाचे काम होते, त्या ठिकाणी शिवसेना मजबूत झाली. तिरंगा फडकवायला मुरली मनोहर जोशी काश्मीरला गेले होते. त्यावेळी मी देखील तिथे होतो. देवेंद्र फडणवीस यांच्याप्रमाणे मी पुन्हा येईन, पण कुठून येईन ते विचारू नका, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.

विविध मुद्द्यांवरून महाविकास आघाडीसह विरोधक सत्ताधारी महायुती सरकारवर टीका करताना पाहायला मिळत आहे. तर, महायुती सरकार विरोधकांना जशास तसे उत्तर देताना दिसत आहे.

ठाकरे गटाचे विधान परिषदेतील सदस्य अंबादास दानवे यांचा कार्यकाळ समाप्त होत आहे. त्यामुळे विधान परिषद सदस्यांकडून त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी अंबादास दानवे यांनी मनोगत व्यक्त केले.

### गिरीश महाजन आणि मी सतरंजीवर झोपायचो

माझ्यावर अनेक केसेस झाल्या दोन तीन वेळा तडीपार नोटीस निघाल्या. एक काळ असा होता गिरीश महाजन आणि मी सतरंजीवर झोपायचो, अशी आठवण अंबादास दानवे यांनी सांगितली. तसेच शिवसेनाप्रमुखांना पहिल्यांदा भेटायला गेलो होतो, त्यावेळेस खैरे आणि रावते यांच्यामध्ये काहीसा वाद होता. बाळासाहेब म्हणाले की तुम्ही खैरेंचे की रावतेंचे? मी म्हणालो की, आम्ही तुमचेच. त्यानंतर बाळासाहेब जे म्हणाले, ते माझ्या मनावर कोरले गेले. बाळासाहेब म्हणाले की, मी उद्या शिवसेना सोडून गेलो तर? त्यामुळे तुम्ही माझे, खैरे किंवा रावतेंचे राहू नका. तुम्ही शिवसेनेचे राहा.

## पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना

### शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने केली घोषणा

**नवी दिल्ली ।** केंद्र सरकारने कृषी विकासाला चालना देण्यासाठी मोठ्या योजनांची घोषणा केली आहे. मोदी सरकारच्या कॅबिनेट बैठकीत यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा पातळीवरील कृषी वाढ आणि प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक संस्थांना बळकट करण्यासाठी या योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. या योजनांवर एकूण वार्षिक खर्च ५०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रस्तावित आहेत.

सरकारने सर्वांगीण कृषी विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना सुरू केली आहे. या योजनेचा उद्देश ३६ केंद्रीय योजनांच्या समन्वयाद्वारे



जिल्हा पातळीवर कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणे हा आहे. या योजनेसाठी वार्षिक २४,००० कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, ज्यामुळे पायाभूत सुविधा, बाजारपेठेतील प्रवेश आणि शेती उत्पादकता यांना पाठबळ मिळणार आहे. राष्ट्रीय पायाभूत सुविधा आणि प्रकल्प महामंडळाच्या क्षमता वाढवण्यासाठी २०,००० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या निधीमुळे एनआयपीसी सौर, पवन आणि हरित हायड्रोजन क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावरील नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणार आहे. यासोबतच स्वच्छ ऊर्जा गुंतवणूक मर्यादित एनसीआयएलला स्वच्छ ऊर्जा गुंतवणुकीसाठी ७,००० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्यामुळे आता गुंतवणुकीला चालना मिळणार आहे. दरम्यान यापूर्वी शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने देखील मोठा निर्णय घेतला होता, काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारने तुकडे बंदी कायदा रद्द करण्याची घोषणा केली होती. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतची घोषणा केली होती.



## आव्हाड-पडळकर यांच्यात शिवीगाळ

**मुंबई ।** विधानभवनाच्या प्रवेशद्वारावर बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात शाब्दिक चकमक उडून हे प्रकरण शिवीगाळपर्यंत गेले. काही दिवसांपूर्वी आव्हाड यांनी विधानभवनात प्रवेश करत असताना पडळकर यांचे नाव न घेता मंगळसूत्र चोराचा...मंगळसूत्र चोराचा.. अशी घोषणाबाजी करत पडळकरांना डिवचले होते. याचा व्हिडिओ व्हायरलही झाला होता.

## युद्ध उद्याच्या तंत्रज्ञानाने लढण्याची वेळ

### सीडीएस अनिल चौहान यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली ।** जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष पेटल्याचे पहायला मिळाले. यावेळी दोन्ही देशांच्या लष्करी सामर्थ्याची झलक देखील जगाला पाहायला मिळाली. यादरम्यान भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ अनिल चौहान यांनी देशाच्या शस्त्रास्त्र सज्जतेबद्दल एक महत्त्वाचे विधान केले आहे. बुधवारी सीडीएस अनिल चव्हाण यांनी भारताच्या संरक्षण क्षमतांचे तातडीने आधुनिकीकरण करण्याची गरज बोलून दाखवली. आजचे युद्ध उद्याच्या तंत्रज्ञानाने लढले पाहिजे,



जुन्या प्रणालींनी नाही, असे अनिल चौहान म्हणाले आहेत.

युएव्ही आणि काउंटर-अनआर्म्ड एरियल सिस्टीम्स इंडिजनायजेशनवरील नवी दिल्ली येथे आयोजित एका कार्यशाळेत सीडीएस चौहान बोलत होते. यावेळी त्यांनी अधुनिक युद्धात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. आपण आजचे युद्ध कालच्या शस्त्र प्रणालींने जिंकू शकत नाहीत, असे अनिल चौहान म्हणाले. तसेच भारताने अत्यंत महत्त्वाच्या धोरणात्मक मोहिमांसाठी परदेशी तंत्रज्ञानावरील अवलंबत्व कमी करण्याची आवश्यकता आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भारतीय सैन्य आधुनिक काळात सज्ज असलेतरी आजही आपण विदेशातील शस्त्रांवर अवलंबुन आहे. त्यामुळे भविष्यात आपल्याला स्वदेशी शस्त्रांच्या बाबतीत चालना द्यावी लागणार आहे. भविष्यातील युद्ध हे परंपरेनुसार नाही तर आधुनिक काळातील यंत्रणेसोबत लढले जाणार आहे.

**केळी भाव**

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2500 |
| नवती (२) | : 2300 |

**मिश्किली**





## बी. एड. महाविद्यालयांवर नियमानुसार कारवाई

**मुंबई ।** नवी दिल्लीच्या राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने आपले नियामक अधिकार वापरत महाराष्ट्रातील १६ बी.एड. महाविद्यालयांची मान्यता रद्द केली आहे. ही कारवाई नियमानुसार झाली आहे. मान्यता रद्द केलेल्या १६ महाविद्यालयापैकी ९ महाविद्यालये बंद असल्याने तेथे विद्यार्थी प्रवेशित झालेले नाहीत. अन्य ७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ५०० इतकी आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार अमोल खताळ यांनी बी. एड. महाविद्यालयाची मान्यता रद्द झाल्याबद्दल प्रश्न विचारला होता. यावेळी बोलताना पाटील म्हणाले, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत ४७१ बी.एड. महाविद्यालये सहभागी झाली होती. ज्यांची एकूण प्रवेश क्षमता ३६ हजार ४३३ होती. त्यामुळे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अन्य मान्यताप्राप्त महाविद्यालयांमध्ये प्रवेशाची संधी सहज उपलब्ध होईल.

# जामिया इस्लामिया संस्थेची चौकशी

## अक्कलकुवातील मदरसाचा मुद्दा विधानसभेत गाजला

**मुंबई ।** अक्कलकुवा येथील जामिया इस्लामिया इसातूल उलुम या धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थेच्या मदरशामध्ये येमेन देशातील दोन नागरीक बेकायदेशीर वास्तव्य करत असल्याचे समोर आल्यानंतर गृह विभागाने एटीएसच्या माध्यमातून संस्थेची चौकशी सुरू केली असल्याची माहिती गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी बुधवारी विधानसभेत दिली. या संस्थेत ७२८ कोटी रुपयांची मोठी उलाढाल झाली असल्याने हे प्रकरण ईडीकडे चौकशीसाठी देण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे. गृह विभागाने धर्मादाय आयुक्तांकडेही हे प्रकरण चौकशीसाठी दिले असल्याचे माहिती भोयर यांनी सांगितले.

भाजपचे आमदार देवेंद्र कोठे यांनी यासंदर्भात आज विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. येमेन देशातून आलेल्या व्यक्तींच्या व्हिसाची मुदत १९ फेब्रुवारी २०१६ रोजी संपूनही त्या व्यक्ती संस्थेच्या मदरशात राहत होत्या. त्यामुळे या मदरशाची मान्यता रद्द करण्याची मागणी कोठे यांनी केली. या संस्थेने आदिवासी समाजाच्या जमिनी बळकवल्या आहेत तसेच शिष्यवृत्तीत घोटाळाही केल्याचा आरोप कोठे यांनी यावेळी केला.

यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना भोयर म्हणाले की, येमेन देशातील दोन नागरीक व्हिसा संपल्यानंतरही मदरशात राहत होते. ही बाब पोलिसांच्या लक्षात आल्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. संस्थेच्या संस्थापक आणि अध्यक्षांनाही अटक केली. मात्र, नंतर त्यांना जामीन मिळाला. या संस्थेला परदेशातून मदत मिळत होती. त्यामुळे याविषयीची तक्रार राज्य सरकारने केंद्राकडे केली आहे. या संस्थेने आदिवासींची जमीन बळकावल्याचा तसेच शिष्यवृत्ती घोटाळा केल्याच्या आरोपांचीही चौकशी केली जाईल, असे भोयर यांनी सांगितले.

येमेनच्या नागरीकांना इथे आधारकार्ड, पॅनकार्ड, जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला कसा मिळाला? ज्या अधिकाऱ्यांनी कागदपत्रांची पडताळणी न करता हे दाखले दिले त्यांना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी यावेळी भाजप आमदार हरिश पिंपळे यांनी केली. त्यावर, ही बाब तपासून अधिकाऱ्यांनी तसे केले असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे भोयर यांनी सांगितले.

## अवैध सावकारी प्रकरणांची जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी

**मुंबई ।** शासकीय परवाना नसताना सावकारी व्यवसाय करून शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे हडप करण्याच्या तक्रारींवर आता जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी करण्यात येणार येत असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. तसेच जमीन हडपण्याच्या आतापर्यंतच्या अशा प्रकरणांमध्ये ७७१ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत मिळवून देण्यात आल्याचेही पाटील यांनी सांगितले.

राज्यातील अवैध सावकारीबाबत शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या संजय देरकर यांनी प्रश्न विचारला होता. यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना पाटील म्हणाले, राज्यात अवैध सावकारीच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांची जमीन हडप केल्याच्या तक्रारी प्राप्त होत असून, अशा प्रकरणांमध्ये शासनाने कठोर भूमिका घेतली आहे. परवाना नसलेल्यांनी सावकारी करणे बेकायदेशीर आहे. फक्त परवानाधारकांनीच कायदेशीर व्याजदर आकारून व्यवहार करावा. तसेच सावकारांनी व्याजदराची माहिती त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर लावणे आवश्यक आहे.




cmyk